# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.09.2023** **वारःशुक्रवार**

---

1. नारी शक्ती वंदन विधेयकामुळे महिला सक्षमीकरणाला नवी ऊर्जा मिळेल, विधेयकाच्या राज्यसभेतील मंजुरीनंतर पंतप्रधानांना विश्वास,
2. कॅनडाच्या नागरिकांसाठी भारताची व्हिसा सेवा तात्पुरती स्थगित,
3. भारताला जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था करण्यात उत्तर प्रदेश महत्त्वाची भूमिका बजावेल, राष्ट्रपतींचं प्रतिपादन,
4. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज भारत मंडपम इथं जी-20 च्या चमूशी साधणार संवाद आणि
5. भारत-ऑस्ट्रेलिया दरम्यानचा पहिला एक दिवसीय क्रिकेट सामना आज मोहाली इथं खेळला जाणार.

**<u>महिला आरक्षण</u>**

नारी शक्ती वंदन अधिनियम विधेयक काल राज्यसभेत एकमतानं मंजूर झालं. 214 सदस्यांनी विधेयकाच्या बाजूने मत नोंदवलं. याआधी हे विधेयक लोकसभेत बहुमताने मंजूर करण्यात आलं होतं. या विधेयकाला संसदेची मंजुरी मिळाल्यानं आता ते राष्ट्रपतींकडे पाठवण्यात येईल; त्यांच्या स्वाक्षरीनंतर त्याचं कायद्यात रुपांतर होईल. या ऐतिहासिक विधेयकाच्या मंजुरीनंतर सभागृहाचं कामकाज, नियोजित वेळेच्या एक दिवस आधीच संस्थगित करण्यात आलं.

लोकसभेत चांद्रयान-3 मोहीम यशस्वी झाल्याबद्दल भारतीय अवकाश संशोधन संस्थेचं अभिनंदन करणारा ठराव मंजूर झाल्यानंतर लोकसभेचंही कामकाज संस्थगित करण्यात आलं. नारी शक्ती वंदन विधेयकावर दोन्ही सभागृहांमध्ये विस्तृत आणि सकारात्मक चर्चा झाली. दोन्ही सभागृहातल्या एकंदर 132 सदस्यांनी यावर आपापली मतं मांडली, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत सांगितलं. विधेयकाला पाठिंबा देणाऱ्या सर्व सदस्यांचे त्यांनी आभार मानले. या विधेयकामुळं देशवासियांमध्ये नवा विश्वास निर्माण होईल, तसंच विविध राजकीय पक्षांच्या सकारात्मक विचारांमुळं महिला सक्षमीकरणाला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

**<u>नारी शक्ती</u>**

नारीशक्ती वंदन अधिनियमाच्या बाजूनं मतदान करणाऱ्या सर्व राज्यसभा खासदारांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आभार मानले आहेत. लोकशाहीच्या प्रवासातील हा एक निर्णायक क्षण असल्याचं पंतप्रधानांनी एका सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटलं आहे. संसदेत हे विधेयक मंजूर झाल्यामुळे देशात महिलांचं प्रतिनिधित्व वाढेल त्याबरोबरच देश सक्षमीकरणाच्या युगात प्रवेश करेल. हा केवळ एक कायदा नाही तर देशातील सर्व महिलांच्या शक्ती, धैर्य आणि अदम्य भावनेची आठवण करून देणारा हा उत्सव आहे असंही ते म्हणाले. हे एक ऐतिहासिक पाऊल असून महिलांचा आवाज अधिक प्रभावीपणे ऐकला जाईल, याची खात्री पंतप्रधानांनी व्यक्त केली.

**<u>कॅनडा व्हिसा</u>**

भारत आणि कॅनडाच्या ताणलेल्या संबंधांच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या कारणास्तव ई-व्हिसासह भारताची कॅनडातली व्हिसा सेवा तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय काल घेण्यात आला. हिंसाचाराला चिथावणी, कॅनडाच्या यंत्रणांची निष्क्रीयता आणि

कॅनडातला भारतीय दूतावास आणि उच्चायुक्तालयाच्या कामात व्यत्यय येण्यासारखी परिस्थिती या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात येत असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी काल दिली. एखाद्या वेगळ्या देशातूनही कॅनडाच्या नागरिकांना भारताच्या व्हिसासाठी अर्ज करता येणार नाही, मात्र, वैध व्हिसा किंवा भारतात येण्यासाठी आवश्यक कागदपत्रं असलेली कोणतीही व्यक्ती भारतात येऊ शकते, असंही बागची यांनी सांगितलं. भारतात काम करणाऱ्या कॅनडाच्या राजनैतिक अधिकाऱ्यांच्या संख्येबाबत विचारलं असता, या संख्येत समता आणण्याची गरज भारतानं अधोरेखित केल्याचं आणि कॅनडाच्या अधिकाऱ्यांची संख्या कमी होणार असल्याचं त्यांनी नमूद केलं. हरदीप सिंह निज्जर प्रकरणी कॅनडानं कोणतीही विशिष्ट माहिती न दिल्याचं सांगून, कॅनडाच्या भूमीवर हिंसक कारवाया सुरू असल्याच्या भारतानं पुरवलेल्या माहितीवर कॅनडानं कोणतीही कारवाई न केल्याचं बागची यांनी सांगितलं. कॅनडा सरकारनं केलेल्या आरोपांमागं राजकीय हेतू आहे, कॅनडा हे संघटित दहशतवाद्यांसाठी सुरक्षित ठिकाण झालं आहे, असं सांगून अशा प्रकारांना आळा घालण्याचं आवाहन त्यांनी कॅनडाला केलं. दहशतवादाचे आरोप असलेल्या 25 जणांचं भारताकडं प्रत्यार्पण करण्याची किंवा त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी भारतानं कॅनडाकडं केली होती, पण त्याला सकारात्मक उत्तर मिळालेलं नाही, असंही बागची म्हणाले. भारतातल्या परदेशी राजनैतिक अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नाबद्दल विचारलं असता, भारत व्हिएन्ना करारातल्या तरतुदी अतिशय गांभीर्यानं घेतो आणि या अधिकाऱ्यांना योग्य ती सगळी सुरक्षा पुरवली जाईल, कॅनडानंही तेच करावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या सबंध मुद्द्याबाबत भारत आपल्या मित्रराष्ट्रांशी, तसंच भागीदारांशी संपर्कात असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

**<u>राष्ट्रपती उत्तरप्रदेश</u>**

भारताला जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था करण्यात उत्तर प्रदेश महत्त्वाची भूमिका बजावेल, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल केलं. गौतम बुद्ध नगर जिल्ह्यात पहिल्या उत्तर प्रदेश आंतरराष्ट्रीय व्यापार कार्यक्रमाचं उद्घाटन केल्यानंतर त्या बोलत होत्या. तरुण स्वयंउद्योजकांनी, विशेषतः महिलांनी तयार केलेली उत्पादनं या प्रदर्शनात मांडण्यात आल्याचं नमूद करून स्वयंउद्योजकतेतला महिलांचा सहभाग वाढत आहे, मात्र तो आणखी वाढण्याची गरज आहे, असं राष्ट्रपतींनी सांगितलं. उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह इतर मंत्री या कार्यक्रमाला उपस्थित होते. हे प्रदर्शन 25 सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

**<u>मोदी-जी-20</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी भरत मंडपम इथं जी-20 च्या चमूशी संवाद साधणार आहेत, तसंच सभेलाही संबोधित करणार आहेत. जी-20 परिषद यशस्वी करण्यासाठी हातभार लावलेले सुमारे तीन हजार लोक या कार्यक्रमात सहभागी होतील. स्वच्छता कर्मचारी, चालक, भोजन कर्मचारी यासह विविध मंत्रालयांच्या कर्मचाऱ्यांचा यात समावेश आहे. वेगवेगळ्या खात्यांचे मंत्री, तसंच अधिकारीही या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**<u>नदी उत्सव</u>**

नवी दिल्लीतील इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्रात आजपासून चौथा नदी उत्सव सुरू होत आहे. थेरिव्हर ही या उत्सवाची संकल्पना असून हा कार्यक्रम यावर्षी यमुनेवर केंद्रित असेल. तीन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात सांस्कृतिक कार्यक्रम, पुस्तक मेळा, माहितीपट महोत्सव आणि कठपुतली सादरीकरण यासह विविध कार्यक्रमांचा समावेश असेल. यात नदी संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणारी चित्रं, सांझी कला आणि शाळकरी मुलांची चित्रं प्रदर्शित केली जानार आहेत. जलसाठ्यांबाबत अधिक जनजागरूकता निर्माण करण्याचा उद्देश असल्याचं संस्कृती संवर्धनासाठीच्या राष्ट्रीय मिशन चे सहाय्यक संचालक अभय मिश्रा यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं.

**<u>साखर आदेश</u>**

साखरेच्या बाजारपेठेतली साठेबाजी थांबवण्याच्या दृष्टीनं साखरेच्या आपल्याकडच्या साठ्याची माहिती दर आठवड्याला प्रसिद्ध करण्याचे आदेश केंद्रानं काल साखरेचे व्यापारी, घाऊक आणि किरकोळ विक्रेते, साखर प्रक्रियाकर्त्यांना दिले. Esugar.nic.in या संकेतस्थळावर त्यांना ही माहिती दर सोमवारी द्यावी लागणार आहे. साखरेच्या बाजारपेठेत संतुलन

राखण्याच्या दिशेनं सरकारनं उचललेल्या अनेक पावलांपैकी हे एक पाऊल असल्याचं प्रतिपादन ग्राहक कल्याण, अन्न आणि सार्वजनिक पुरवठा मंत्रालयानं काल केलं. साखरेची साठेबाजी थांबवून सर्वांना परवडण्याजोग्या किंमतीत साखर उपलब्ध करून देण्याचं सरकारचं ध्येय असल्याचं मंत्रालयानं सांगितलं. साखरेच्या साठ्याची माहिती उपलब्ध झाल्यामुळं साखरेच्या उपलब्धतेवर लक्ष ठेवण्यास आणि यात फेरफार करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यास नियामकांना मदत होईल, असंही मंत्रालयानं नमूद केलं.

**फुटबॉल**

एसएएफएफ अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या 19 वर्षांखालच्या फुटबॉल संघानं काल सलामीच्या सामन्यात बांगलादेशवर 3-0 अशा विजय मिळवला. आता भारताचा ब गटातला पुढचा सामना सोमवारी नेपाळसोबत होणार आहे. हा सामना जिंकून बाद फेरीत पोचण्याचं भारताचं लक्ष्य असेल.

**क्रीडा**

चीनच्या हांगझू इथं उद्यापासून सुरू होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनसमारंभासाठी पुरुष हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि ऑलिम्पिक मुष्टियुद्ध पदकविजेती लोव्हलिना बोरगोहेन भारतीय चमूचे ध्वजधारक असतील. भारतीय ऑलिम्पिक समितीनं यंदा दोन ध्वजधारकांवर ही जबाबदारी देण्याचा निर्णय घेतला आहे. भारताकडून एकंदर 655 खेळाडू यंदा आशियाई स्पर्धेत भाग घेणार आहेत आणि हा भारताचा आत्तापर्यंतचा सर्वात मोठा चमू आहे.

**जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धा**

सर्बियाच्या बेलग्रेड इथं सुरू असलेल्या जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या अंतिम पंघलनं महिलांच्या 53 किलो वजनी गटात कांस्यपदकला गवसणी घातली आणि 2024 च्या ऑलिम्पिक स्पर्धेतलं आपलं स्थानही निश्चित केलं. 19 वर्षांच्या अंतिम हिनं दोनवेळा युरोपीय अजिंक्यपद विजेत्या एमा जोना डेनिस माल्मग्रेन हिचा 16-6 असा पराभव केला आणि या स्पर्धेतलं पहिलं पदक भारताला मिळवून दिलं. अंतिमनं आजपर्यंत जागतिक अजिंक्यपद स्पर्धांमध्ये एकंदर 23 पदकं पटकावली आहेत. यात एक सुवर्ण, पाच रौप्य आणि 17 कास्यपदकांचा समावेश आहे.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यानच्या तीन एक दिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना आज मोहाली इथल्या बिंद्रा स्टेडीयम इथं खेळला जाणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी दीड वाजता सामना सुरू होणार आहे. येत्या ऑक्टोबर – नोव्हेंबर महिन्यात भारतामध्ये खेळल्या जाणाऱ्या विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर हा सामना म्हणजे दोन्ही संघांसाठी रंगीत तालीम असणार आहे. रोहित शर्माच्या अनुपस्थितीमुळे पहिल्या दोन सामन्यात के. एल  राहुल भारतीय संघाचं नेतृत्व करणार असून रविंद्र जडेजा उपकप्तान असेल. पहिल्या दोन सामन्यांसाठी रोहित शर्मा, अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या यांना विश्रांती देण्यात आली असून तिसऱ्या सामन्यात हे सर्व खेळाडू भारतीय संघात सहभागी होतील.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**